

एकलव्य

बिरसा मुंडा

तंट्या भिल्ल

राघोजी भांगरे

राणी दुर्गावती


खाज्या नाईक

डॉ. गोविंद गारे

नोंदणी क्र. : संस्था ३७६/८८
ट्रस्ट : एफ-४८६२/८८

आदिवासी समाज कृती समिती
महाराष्ट्र, पुणे

# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

५३/१ब, विनायक नगर, पिंपळे गुरव, पुणे - ६१.
फोन : (०२०) २७२८५१६३



# अहवाल

## सन २०१५ ते २०१६

# संस्थेचे पदाधिकारी



श्री. सीताराम जोशी
अध्यक्ष



श्री. नामदेव गांभिरे
कार्याध्यक्ष



श्री. एकनाथ बुरसे
उपाध्यक्ष




श्री. खेवजी भोईर
उपाध्यक्ष




श्री. सतीश लेंभे
सचिव



श्री. दुंदा मोरे
सह-सचिव



श्री. लक्ष्मण भालेकर
खजिनदार



श्री. रामचंद्र शेळकंदे
संचालक



श्री. गंगाराम सांगडे
संचालक



श्री. किसन भोजने
संचालक



श्री. सुदाम चपटे
संचालक



श्री. प्रशांत शिंगाडे
संचालक



श्री. गोविंद झांजरे
पदसिद्ध संचालक

# आवाहन

कोणत्याही क्षेत्रातील निकाल हा त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कतृत्ववान माणसांच्या कामाचा इतिहास असतो अगदी त्याप्रमाणे कुठल्याही समाजाचे मोठेपण हे त्या समाजातील सुसंकृत मंडळीच्या कार्यावर अवलंबून असते.

आपण आपल्या कुटुंबाबरोबरच आपल्या समाजाचे दिपस्तंभ आहोत. ''मानला तर दगड नाहीतर देव'' आपली भूमिका माणूस म्हणून जगताना स्वत:साठी जगला तो मेला व इतरांसाठी जगला तो जगला. आपण कोणती भूमिका अंगिकारली पाहिजे हे आपल्याला आपले संस्कार शिकवितात. मी कोठे आहे? कोठून आलो? का आलो? कसा आलो? माझे अस्तित्व काय? माझी ओळख काय? मला कोण कोण विचारतो? या सगळ्याचा विचार केला तर आपण कुठे आहे हे आपण समजते. परमेश्वराने आपणाला हा नरदेह दिला आहे तो मातीत जाणार आहेच पण हे करताना थोडे समाजाकडे पाहिले तर परमार्थ आपोआपच साधला जाईल.

आपल्या अदिम समाजासाठी अनेकांनी त्यांचा विकास व्हावा म्हणून आतोनात कष्ट केले आहेत. आमटे परिवाराची माहिती आपणांस सांगण्याची गरज नाही. ठक्करबाप्पा, गोदाताई परुळेकर, अनूताई वाघ, जनार्दन वळवी, विवेक पंडित अशी कार्यकर्त्यांची मालिकाच डोळ्यापुढे येते. समाजाच्या नसणाऱ्या पण आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या अशा शेकडो कार्यकर्त्यांना आमचा सलाम आहे.

आदिवासी कुटुंबात जन्म घेतला हे आपले भाग्य आहे, म्हणून आज आपण अत्यंत मानाने उत्तम पदावर काम करीत आहोत. यापैकी मागे राहणाऱ्या आदिवासींच्या विकासासाठी कार्य करु, परिश्रम करु अशी आपली भूमिका असली पाहिजे. अनेक कार्यकर्ते या विभागात काम करतात.

आदिवासी समाजकृति समिती गेली २८ वर्षे अखंडपणे या समाजाच्या उद्धारासाठी कार्यरत आहे. विद्यार्थी मार्गदर्शन, शिक्षक कृतीसत्रे, सामुहिक विवाह, कार्यकर्त्यांचे संघटन, महिलांचे मेळावे, व्यवसाय मार्गदर्शन, आदिवासींचे हक्क अधिकार या आणि अशा असंख्य प्रश्नावर कार्य सुरु आहे. शिक्षणासाठी धडपडणारी अनेक तरुण मुले-मुली पुढे येत आहे, त्यातील अनेकांना माहितीची गरज आहे. शासनदरबारी अनेकदा आपल्या अधिकारासाठी ओरडावे लागत आहे.

आपण सगळे एकत्र येऊ. आपल्या भल्यासाठी कृती समितीत समाविष्ट होऊ. शक्य होईल ते करायचा प्रयत्न करु. आदिवासींचे शिक्षण हे ब्रीद ठेवू आणि कृती करु !

संचालक मंडळाचे वतीने

**सीताराम जोशी**
अध्यक्ष

**नामदेव गंभिरे**
कार्याध्यक्ष

# आदिवासी समाज आणि संघटना



श्री. नामदेव देवराम गंभिरे
कार्याध्यक्ष

कोणत्याही समाजाचा खऱ्या अर्थाने शैक्षणिक, सामाजिक व राजकीय विकास करावयाचा झाल्यास त्या समाजाची संघटनात्मक बांधणी असावी लागते. जोपर्यंत समाज एक होत नाही, तोपर्यंत त्या समाजाचा उद्धार होणार नाही हे निश्चित. याकरिता त्या समाजाचा कट्टर अभिमान, देशनिष्ठा असावी लागते. वैयक्तिक स्वार्थात गुरफटलेला समाज फारशी प्रगती करु शकत नाही. तसेच एकटा दुकटा कुणीही सामाजिक प्रगती करु शकणार नाही. म्हणून समाज कधीच एकत्र होणार नाही. जोपर्यंत त्यास चांगले नेतृत्त्व लाभणार नाही. म्हणून समाजासाठी रात्रंदिवस झपाटलेल्या व्यक्ती आणि संघ यांची सामुहिक जबाबदारी म्हणजेच संघटन आणि एकदा संघटन झाले की, विजयाची खात्री झाली म्हणून समजा.

शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची त्रिसुत्री कोणत्याही समाजाच्या उत्थापनासाठी उपयोगी ठरते. आपल्या समाजाची आत्ताशी पहिली व कदाचित शिक्षणाची दुसरी पिढी शिक्षण घेऊ लागली आहे. स्वातंत्र्यपूर्व भारतात वर्ण व्यवस्थेशी झगडताना अनेक जाती-जमाती बळी पडली होती. त्याची घडी कायद्याच्या चौकटीत बसविण्याचे काम राज्यघटनेच्याद्वारे एकता, समानता व बंधुत्त्वाची स्थापना करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. आपल्याला घटनेने दिलेले अधिकार व कर्तव्याची जाण असणे आवश्यक आहे. आजही हा समाज अत्यंत भरकटलेल्या अवस्थेत आहे. या समाजामध्ये जाती-जातींमध्ये भांडणे लावण्याचे काम काही राजकीय पक्ष व त्यांचे नेते करत आहेत. ज्या समाजात महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या विकासासाठी त्यांचे संपूर्ण आयुष्य वेचले. छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांना सत्तेत सहभागी करुन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली, त्या हिंदुस्थानात आता जाती-जातीच्या नावाने समाजात दरी निर्माण करण्याचे काम प्रयत्नपूर्वक केले जात आहे. आज जातीयता तशी कोणी मानत नाही, कारण जागतिक बदलामुळे सर्व जगच एकत्र आले. तंत्रज्ञानाची अफाट प्रगती झाली आहे. शेती व शिक्षणात मोठ्या प्रमाणात क्रांती झाली आहे. लोक संघटीत होत आले. लोकांची आर्थिक परिस्तिती व रहाणीमान उंचावलेले आहे. परंतु समाजातील काही लोकांची व नेत्यांची संकुचित वृत्ती आपल्या भुतकालीन समाजसुधारकांचे वैयक्तिक भांडवल करुन त्या त्या समाजात त्यांचे राजकारण राहिले आहेत.

ज्या आदिवासी समाजाने वरील सर्वांच्या आधी या देशाच्या रक्षणाकरीता रक्त सांडवले आहे, त्या आदिवासी समाजाची इतिहासाने फारशी दखल घेतली नाही. आदिवासींची वेगळी भाषा, संस्कृती, राज्य नव्हे तर त्यांची स्वतंत्र अशी चलन व्यवस्था होती. त्याचा कुठेही नामोल्लेख होताना दिसून येत नाही. या समाजाचा अशिक्षितपणा, बुजरेपणा, मितभाषी, काळे, उघडा-नागडा अशी त्याची अवहेलना करुन कायमच त्यांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले आहे. अशा परिस्थितीत या समाजाला कुणीही गॉडफादर राहिलेला नाही. कुणी निर्माण होत नाही, कुणी निर्माण होण्याचा प्रयत्न केला तर त्याची जागा दाखविण्यात येते. अशा असहाय्य समाजाने कुणाच्या भरवशावर प्रगतीच्या रथावर आरुढ व्हावे, हा सतावणारा प्रश्न आहे.

पूर्वीप्रमाणे आजही आपला समाज दुर्गम अशा डोंगरामध्ये रहातो. शहरापासून दूर अंतरावर रहात असल्यामुळे त्याचे जीवनमान फक्त जल, जंगल आणि जमिनीवरच अवलंबून आहे. ज्याच्यावर पुर्वी त्याची मालकी होती. त्यांचे संरक्षण आणि संवर्धन तो करीत असे. परंतु ब्रिटीश सरकारने जंगल कायदे आणले आणि ते आज आदिवासींच्या विनाशाचे कारण ठरत आहे. ना जलावर अधिकार, ना वनावर ! आता तर राहिलेल्या जमिनीही धनदांडग्यांनी बळकावलेल्या आहेत. अशा परिस्थितीत समाजाचा विकास कसा होईल ? आहे त्या परिस्थितीतही त्यांचा कोणावरही रोष नाही किंवा कोणताही संघर्ष नाही. परंतु तुम्ही आमच्याच जागेत धरण बांधून आमच्याच आयुष्याचे मरण ओढून आणलेले आहे. आम्ही धरण परिसरात राहतो, वर्षभर शेतीला तर सोडा परंतु पिण्याच्या पाण्याचेही दुर्भिक्ष आमच्यासमोर

उभे आहे. शेकडो किलोमीटर अंतरावर कॅनॉलच्या सहाय्याने पाणी वाहून नेऊन मोठ्या प्रमाणात खर्च करुन शासन प्रस्थापितांच्या ऊसाचे मळे फुलवत आहे. परंतु आदिवासींना साधे पिण्याची पाणी देऊ शकत नाही, ते शासन कसले ? आदिवासी कुटुंबामध्ये जी व्यक्ती शिकते त्यास त्याच्या संपूर्ण घरादाराचे, त्याचबरोबर आई-वडील, भाऊ-बहिण, काका, मामा-मावशी अशा सर्व नातेवाईकांची जबाबदारी पार पाडावी लागते. ती आयुष्यभर निभावता-निभावता निवृत्ती येते आणि पुन्हा त्याची रवानगी जंगलात होते. अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पेलवत असतांना तो काही अंशी घराचे नेतृत्त्व करतो. परंतु समाजाचे नेतृत्त्व करण्याचे संघटन कौशल्य त्याच्याकडे नसते. ना सत्ता ना पैसा ! अशी अवस्था असलेला समाज कुठवर या मोहमायी जगामध्ये तग धरेल त्याची खात्री देता येत नाही. महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज यांची विभागणी त्या त्या समाजाने करुन घेतलेली आहे. इतकेच नव्हेत तर देव आणि दैवतेही स्वार्थी लोकांनी आपआपसांत वाटून घेतली आहेत. मग आदिवासी समाजाने कोणाच्या खांद्यावर हात टेकावे, कुणाच्या हातात हात द्यावा की, जो नि:स्वार्थीपणे त्यांची सोबत करेल. असे अंध:कारी वास्तव असले तरी आदिवासी माणसाची जगण्याची व जीवनाकडे बघण्याची दृष्टी सकारात्मक आहे. आज ना उद्या हा समाज अंधारातून प्रकाशाकडे गेल्याशिवाय राहणार नाही. आदिवासींचे संस्कृती ही निसर्गाशी जुळणारी संस्कृती आहे. त्यामुळे निसर्गावर जे घाले होत आहेत ते त्या समाजावर होत नसून पूर्ण मनुष्य-प्राण्यांवर होत आहेत याची जाणीव प्रस्थापितांनी ठेवण्याची गरज आहे.

आदिवासी समाजात एकूण ४५ जाती व त्याच्या उपजाती आहेत. हाताच्या बोटावर मोजण्या इतपत समाजातील मुले शिकली आहेत. त्यात फक्त १०% मुले पदवीधर व उच्च पदवीधर आहेत. ५०% पेक्षा जास्त मुले-मुली १० व १२ वी च्या आतच शिक्षणाला पारखी होत आहेत. मुलींच्या शिक्षणाविषयी न बोललेलेच बरे ! इतकी दयनीय अवस्था आहे. स्वत:च्या शैक्षणिक संस्था, उद्योगधंदी असणारी उदाहरणे फारच कमी आहेत. राजकीय नेतृत्वही एवढे परिपक्व नाही. त्यामुळे सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांचा बॅकलॉग आहे. त्याचे कारण ज्यांच्याकडून समाजाच्या फार अपेक्षा असणारा वर्ग उच्चशिक्षित अधिकारी, राजकीय नेते व उद्योग व्यावसायिकांवर अवलंबून आहे आणि हाच वर्ग पुन्हा समाजाकडे मागे वळून पाहत नाही आणि इथेच खरंतर समाजाची प्रगती होणे ऐवजी अधोगती होत असल्याचे दिसून येत आहे. समाजाच्या या मानसिक दुबळेपणाचा फायदा इतर प्रगत समाजातील जाती घेत असल्याचे दिसून येत आहे. नजीकच्या काळात इतर समाजातील अनेक जाती अनुसूचीत जमातीच्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी जीवाचा आटापिटा करताना आपण पाहत आहोत. आदिवासी म्हणून कोणतेही निकष पुर्ण करत नसतांना डॉ. बाबासाहेबांची स्पेलिंग मिस्टीक झाली असल्याचे भासवून धादांत खोटार्डे आणि गलिच्छ राजकारण काही सत्तापिपासू व लालची राजकारणी मतांच्या भिकेसाठी घटना बदलावयास चाललेल्या राजकारण्यांची किव आल्यावाचून रहात नाही. गेल्या अनेक वर्षात सुमारे एक लाख पंच्याहत्तर हजार आदिवासींच्या सरकारी नोकरीतील जागा बळकावणारे बोगस आदिवासी आम्ही पाहत आहोत, हे फायदे घेत असतांना या बांडगुळांची नाळ आदिवासी समाजाशी जुळली आहे काय ? एका कार्यालयात काम करत असतांना त्यांना आदिवासींची दु:खे, आदिवासींचे संघर्ष व आदिवासीं सुख याकरीता कधी एकत्र आलेत का ? त्याचे उत्तर नाही असे असून त्यांना आदिवासी समाजाचे काहीही देणं-घेणं लागत नाही. फक्त ह्या मंडळींना आदिवासींच्या सवलती लाटावयाचे आहेत. म्हणून त्यांचे मनसुबे धुळीला मिळवावयाचे असतील तर संघटनांची मजबूत बांधणी करुन एक पॉवरफूल सत्ता निर्माण केल्याशिवाय या समाजाला तरणोपाय नाही. असे नमूद करावेसे वाटते. एकदा संघटनांची मजबूत बांधणी ग्रामीण व शहरी समाजबांधव सर्व राजकीय नेतृत्त्व परिपक्व झाल्यावर कोणत्याही समाजाची आमच्याकडे वाकडी नजर करण्याची हिंमत होणार नाही आणि आम्ही शेती, शिक्षण, आरोग्य आणि राजकीय या सर्व आघाड्यांवर नेत्रदिपक अशी भरीव कामगिरी करुन आदिवासी समाजाला इतर पुढारलेल्या समाजाबरोबर विकासाची सांगड घातल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.

# सन २०१५-२०१६ कार्याचा आढावा

## गुणवंत आदिवासी विद्यार्थी सत्कार २०१५

संस्थेतर्फे 'गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम १९ जुलै २०१५ रोजी 'आंबेडकर भवन, पुणे' येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नागनाथ कोतापल्ले, ज्येष्ट साहित्यीक व विचारवंत उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री.नामदेव गंभिरे हे होते. सदर कार्यक्रमात आदिवासी समाज कृती समितीचे अध्यक्ष श्री सीताराम जोशी लिखीत 'अधिकारी माणूस' या पुस्तकाचे प्रकाशन व संस्थेचे २०१२-२०१५ चे कार्याचा अहवाल प्रकाशन प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे उपस्थितीत करणेत आले.

कार्यक्रमात इ.१२ वी शास्त्र शाखेत सर्वप्रथम आल्याबद्दल कु. ऋतुजा नामदेव गंभिरे व कु. निखिल संतोष बांबळे इ.१० वी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा स्व. प्रतापराव देशमुख स्मृतिपुरस्कार देऊन गौरविण्यात आले तर, पुणे जिल्हा व नगर जिल्ह्यात इ.१० वी मध्ये अनुक्रमे कु. ऋतिक दिलीप बांबळे, कु. कोमल तानाजी लांडे व कु. तुषार लंकानाथ गभाले तर इ.१२ वी मध्ये कु.नम्रता ज्ञानदेव मुकणे ह्या विद्यार्थ्यांना रोख पुरस्कार व स्मृतीचिन्ह देऊन तसेच, सर्व उपस्थित उत्तिर्ण विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.

## स्व.देवराम सखाराम गंभिरे उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार

स्व.देवराम सखाराम गंभिरे ह्यांचे स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार ॲड.मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजुर (अकोले) अहमदनगर येथे १६ ऑगस्ट २०१५ रोजी आदिवासी समाज कृती समितीचे अध्यक्ष श्री.सीताराम जोशी ह्याचे हस्ते शासकिय आश्रमशाळा, राजुर (इंग्रजी माध्यम) ह्यांना मुख्याध्यापक श्री. बी. डी. गवारी व सहकाऱ्यांना रोख रु. ११,०००/- व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास श्री. के. बी. धोंगडे, निवृत्त मुख्याध्यापक, ज्यांचा नामदेव गंभिरे ह्यांना घडविण्यात मोठा वाटा होता. त्यांचा देखील अध्यक्षांचे हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे निमित्त साधून विविध क्षेत्रात नैपुण्य दाखविलेले डॉ. मयुरा गंभिरे, डॉ. ऋतुजा गंभिरे, इंजि. निता गोडे, इंजि. राणी घाटकर व इंजि. सुनिल भांगरे तसेच उदयोन्मुख उद्योजक श्री. सतीश भांगरे व प्रशांत मेचकर ह्यांचा असे ३५ विद्यार्थ्यांचा देखील स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करणेत आला.

उपस्थितांना श्री. नामदेव गंभिरे, सीताराम जोशी तसेच निवृत्त मुख्याध्यापक के. बी. धोंगडे सर ह्यांचे मार्गदर्शन लाभले तसेच विद्यार्थ्यांसाठी श्री. विजय पारधी ह्यांनी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले.

## परीक्षेला सामोरे जातानी

संस्थेतर्फे इ.१० वी चे विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविणेसाठी परीक्षेला सामोरे जातानी घ्यावयाची दक्षता म्हणून उपाध्यक्ष श्री.एकनाथ बुरसे व त्यांची टिम ह्यांनी झंझावाती दौरा जुन्नर, आंबेगाव, खेड व मावळ तालुक्यात घेऊन नऊ कार्यशाळा घेतल्या. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच तसेच इंग्रजी व गणित विषयाचे मार्गदर्शन तसेच परीक्षेला सामोरे जातानी यावर मार्गदर्शन केले.

| ठिकाण | विद्यार्थी | ठिकाण | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कर्मवीर विद्यालय, वाडा | १४५ | शिवाजी विद्यालय, डेहणे | ७० |
| शासकिय आश्रमशाळा, टोकावडे | ६० | गाडगेबाबा आश्रमशाळा, ओतूर | ८० |
| शासकिय आश्रमशाळा, खिरेश्वर | ५५ | दांगट आश्रमशाळा, कोळेवाडी | २९ |
| शासकिय आश्रमशाळा, सोमतवाडी | ६० | शासकिय आश्रमशाळा, सोनावळे | ६० |
| शासकिय आश्रमशाळा, अंजनावळे | ६० | शासकिय अश्रमशाळा, गोहे बु. | ६५ |
| शरद पवार दिव्यालय, डिंभे | ४५ | न्यू इंग्लिश स्कूल, गोहे | ३५ |
| नंदकर आश्रमशाळा, फुलवडे | ६० | श्रीरंग गभाळे विद्यालय, फुलवडे | ४५ |
| शासकिय आश्रमशाळा, राजपूर | ६० | शासकिय आश्रमशाळा, तेरुंगण | ६० |
| शिवशंकर विद्यालय, तळेघर | ६० | न्यू इंग्लिश स्कूल, जांभोरी | ३५ |
| न्यू इंग्लिश स्कूल, चिखली | ३५ | शिवाजी विद्यालय, शिवली (मावळ) | ६५ |

### सदरचे वर्गांना

इंग्रजीसाठी - सर्वश्री शैलेश बर्गे, राजु गायकवाड व चारुलता प्रभुदेसाई व शेखर कोष्टी

गणितासाठी - सर्वश्री दिलीप रावडे, सुभाष धुळे, दिनानाथ गोरे व योगेश वडपुणे, सौ. आशा माने व गोविंद खजुरे

परिक्षेला जाण्यापूर्वी - श्री. एकनाथ बुरसे सर

ह्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे निष्णांत व्याख्यात्यांनी सहभाग घेतला या सर्वांचे आभार

### व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

शालेय अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांना पूढील आयुष्य घडविण्यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास या सारखे विषयांची माहिती असणे नितांत गरजेचे असते म्हणून संस्थेतर्फे

| | | |
|---|---|---|
| १६ ऑगस्ट २०१५ | ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय<br>राजुर, ना. अकोले, जि. अहमदनगर | मार्गदर्शक - विजय पारधी |
| ७ जानेवारी २०१६ | १) डेहणे महाविद्यालय,<br>डेहणे, ता.खेड, जि.पुणे | प्रा.अनिल अडसुळे<br>प्रा.मिलींद गायकवाड |
| | २) शासकिय मुलांचे वसतीगृह,<br>खेड जि.पुणे | प्रा.अनिल अडसुळे<br>प्रा.मिलींद गायकवाड |
| ८ जानेवारी २०१६ | १) बी.डी.काळे महाविद्यालय,<br>घोडेगाव | प्रा.अनिल अडसुळे<br>प्रा.मिलींद गायकवाड |
| | २) शासकिय मुलींचे वसतीगृह,<br>जुन्नर | प्रा.अनिल अडसुळे<br>प्रा.मिलींद गायकवाड |

घेण्यात आले. यानिमित्त जागा उपलब्ध करुन दिलेबद्दल....

१) ॲड.मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजुर
२) डेहणे महाविद्यालय, डेहणे, ता.खेड
३) बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव
४) शासकिय मुला/मुलींचे वसतीगृह राजगुरुनगर व जुन्नर

ह्यांचे व्यवस्थापनाचे हार्दिक आभार तसेच या वर्गांना आपला बहुमुल्य वेळ दिलेबद्दल व्याख्याते मा. प्राचार्य अनिल अडसुळे सर व प्रा. मिलींद गायकवाड ह्यांचे देखील आभार.

## ।। वन जळतय ...।।

उन्हांच्या झळांनी धरणी माता करपली
गवत आनं झाड झुडपं पण बोडकी झाली
देवाचा झाला कोप काही नाही कळत
मात्र नजरेण दिसतय, वन जळतय ...!

पाऊसा अभावी धरणे कोरडी पडली
ओढे, नदी, विहिरी तर केव्हाच हिरमुसली
महागाई आनं शेतकऱ्यांच्या आत्महत्या
नित्याच्याच झाल्यात, वन जळतय ...!

नाही तिथे नको तेवढ्या सुधारणा
विकासाचाही आलाय वीट
गड, किल्ले झालेत भग्न
आम्ही मात्र समुद्रात शिल्प उभारण्यात मग्न ...!

धरणीवरच्या माणसाचंही असंच होतय
कमकुवत समाजवर्ग आणि मुके प्राणी
जसं वनातल्या आगीत नष्ट होणारी वनसंपदा
जळणारं वन दिसतय पण मन जळतंय ते कधी दिसेल ? ..!

**श्री. नामदेव देवराम गंभिरे**
कार्याध्यक्ष,
आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र
पुणे

## ।। आवणी ।।

शेण खांड गोवराचा राब बाबाने भाजला ।
काळ्या मातड वावरी जीव भाताचा रुजला ।।
वर पावसाची झड उब मातीची तळाशी ।
रोप डवरले असे लेक लग्नाआधी जशी ।।

बाबा उखळण करी फिरे नांगराचा फाळ ।
सर्जा राजाच्या घामाने मऊ लोण्याहुनी गाळ ।।
रोपट्याच्या भवताली उभी टिबक्यांची रांग ।
पाठवणी करायला सया खणणीत दंग ।।

अळवाट फिरवुनी गादी वावराची झाली ।
मुठ भरुन घिशाची फिरे वावरात डोली ।।
स्वप्न मातीत खोचले चूड घेवूनिया हाती ।
सुरु जोमात आवणी मागे चालल्यात पाती ।।

मारा पावसाचा जरी अंगी इरल्याची ढाल ।
एका आवणीच्या पोटी सुखे सरतेय साल ।।

**श्री. दुंदा मोरे**
संकलन : उत्तम सदाकाळ

# ९ ऑगस्ट विश्व आदिवासी दिवस

संयुक्त राष्टसंघाच्या सर्वसाधारण आमसभेत दि.२३ डिसेंबर १९९४ रोजी पारित केलेल्या ठराव क्र.४९-९१४ प्रमाणे ९ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस म्हणून जाहीर करण्यात आला. आदिवासी हे या भूमीचे मूळ रहिवासी आहेत, निसर्गात रहाणारे व निसर्गातील घटकांचा उपयोग करुन जीवन जगणारे आहेत. जंगलातील संपत्तीचे संवर्धन करुण जगण्याचे नैसर्गिक संस्कार त्यांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविले जातात. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्ती गेली हजारो वर्षे त्यांनी जपली, पर्यावरणाचा समतोल बिघडू दिला नाही. अशा जमाती टिकविणे व त्यांना त्यांच्या राहत्या जागी नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध करुन देणे प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे. या भावनेतून प्रेरित होऊन जागतिक संघटनेने (युनो)ने सन १९९४ ते २००४ हे दशक जागतिक आदिवासी दशक म्हणून घोषित केले. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस जगभर 'जागतिक आदिवासी गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. तद् नंतर कार्यक्रमाची आवश्यकता पाहून. २००५ ते २०१५ हे दशक जागतिक आदिवासी दशक म्हणून पुन्हा घोषित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर यावर्षी महाराष्ट्रात पुणे, नाशिक, ठाणे, नंदुरबार, धुळे, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील विविध आदिवासी संघटना सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करुन तसेच आदिवासी क्रांतिकारकांच्या शौर्याचा जयजयकार करीत गौरवदिन साजरा होत आहे. महाराष्ट्राशिवाय गुजरात राज्यात सागबारा जि. नर्मदा छेटा उदेपूर, बोडली जि.बडोदा, झगडीया, व्यारा, सोनगड येथील आदिवासी एकता परिषद व भिल्लीस्तान विकास मोर्चा, मध्यप्रदेशातील खट्टी जि.वडवाणी, बागलल जि. देवास येथील आदिवासी विकास संघटना, राजस्थानातील उदयपूर येथील भिल्ल महासंघ, आस्था संस्था, छत्तीसगडमधील आदिवासी विकास परीषद, झारखंडमधील रांचीची आदिवासी धरम परिषद, याशिवाय देशात दिल्ली, त्रिपुरा, नागालँड, प. बंगाल, आसाम, अरुणाचल प्रदेश आदि ठिकाणी ९ ऑगस्ट हा दिवस आदिवासी गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.

आज जगभर आदिवासी जल, जंगल आणि जमिनीचे, नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करत असताना जागतिकीकरणाच्या, विकासाच्या नावाखाली त्यांच्या संस्कृतीवर, भाषेवर, जल, जंगल, जमिनीवर, समूह जीवनावर आक्रमण होत आहे. त्यामुळे या देशातील मूळ निवासी आदिवासींची संस्कृती धोक्यात आली असून, त्यांचे निसर्गाशी असलेले नाते संपुष्टात येत आहे. आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी आदिवासींनी कोणाचेही शोषण केले नाही. तुमच्या भोगवादी संस्कृतीने, ग्लोबल वार्मिंगने संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोक्यात आणले आहे. हरित वायु दुष्परिणाम परीषदेतून युनोने एक महत्त्वपूर्ण निर्णय जगापुढे मांडला आहे तो असा, 'जर नैसर्गिक सजिवसृष्टी वाचवायची असेल तर ती कायदे करुन वाचणार नाही, ती आदिवासींच्या ताब्यात द्या. ते निसर्गावर जेवढे प्रेम करतात तेवढं अन्य कोणावरही करत नाहीत. तेच इथला निसर्ग वाचवू शकतात' हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. यातून आदिवासी जमाती किती महत्त्वाच्या आहेत हे जगाला ध्यानात ध्यावे लागेल. नैसर्गिक संसाधनांचा दुरुपयोग न करता त्यांचे संवर्धन करणे तसेच

पूर्वजांपासून चालत आलेले नैसर्गिक संसाधनांची विरासत भावी पिढीकडे सोपविणे, हे आदिवासी संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे. आदिवासींची एक पारंपारिक धारणा आहे ती म्हणजे, 'ही पृथ्वी माझी नाही, तर मी पृथ्वीचा आहे.' म्हणजे तो या धरतीला जन्मदाती मानतो. तिचे रक्षण आणि संवर्धन करणे स्वत:चे कर्तव्य मानतो. मातेला आणि मातीला तो सारख्याच प्रतिष्ठेने वागवितो. पृथ्वी वाचली तरच त्यावरील जीवसृष्टी वाचेल, ही जाणीव आदिवासी समूहांनी जपली आहे. इतर समूहांना याची जाणीव व्हावी, देशातील राज्यव्यवस्थेला जाणीव व्हावी म्हणून हा विश्व आदिवासी दिवस साजरा व्हायला हवा.

आंतरराष्ट्रीय स्तरावर आदिवासी समूहांच्या हक्कासाठी दोन प्रमुख मसुदे आहेत. आंतरराष्ट्रीय रम संघटनेच्या (आय.ओ.एल.) संकेत क्र.१६९ (१९८९) तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने सप्टेंबर २००७ मध्ये मंजूर केलेला आदिवासी समुहाचा कायदा. परंतु या दोन्ही मसुद्यांबाबत भारत सरकारने भारतात आदिवासी लोक नाहीत असे नोंदविले आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासी शब्दाची नोंद नाही. भारताच्या संविधानात ५ वी ६ वी सुची असूनही त्याची अंमलबजावणी न करता उल्लंघन केले जाते. पेसा (पी.ई.एस.ए.) सारखे आदिवासींच्या हक्काचे कायदे होऊनही त्याची अंमलबजावणी होण्याऐवजी पायमल्ली तुडवले जातात. भारतीय स्वातंत्र्यात आदिवासी क्रांतीकारकांचा गौरवशाली इतिहास नोंदविला गेला नाही. आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरा, खाज्या नाईक, तंट्या भील, बिरसा मुंडा, कुंवरसिंग वसावा, बाबुराव शेडमाके, सिदुकान्ह या व यासारख्या हजारो क्रांतिकारकांनी, देशभक्तांनी ब्रिटीशांविरुध्द लढा दिला. या देशातील अनेक संस्थानिक इंग्रजांना शरण गेलले परंतु आदिवासी समुहांनी मात्र आपल्या जल, जंगल आणि जमिनीसाठी इंग्रजांशी अखेरपर्यंत लढा दिला. जव्हारचे मुकणे राजांचे संस्थान देशाच्या स्वातंत्र्यानंतर विलीन करण्यात आले. १९५७ ला रणदुल्लाखान नावाच्या मुघल बादशहाने ४०० महादेव कोळ्यांच्या कत्तरी करुन शिवनेरी किल्ल्यावर मुंडक्यांचा ढिग रचना. शिवरायांच्या स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या या देशभक्तांच्या बलिदानाचा इतिहास लबाड इतिहासकारांनी लिहिला नसला तरी आजही शिवनेरी किल्ल्यावरचा कोळी चौथरा देशातील आदिवासींसाठी प्रेरणादायी आहे. राजस्थानात मानगड येथे १५०० आदिवासींना एकाचेळी गोळ्या घालून ठार केले. हे जालियनवाला बाग हत्याकांडापेक्षाही अमानुष हत्याकांड हाते. स्वातंत्र्याच्या या लढ्यात मुघल, इंग्रज, जमिनदार, शेठ, सावकार आणि आमचे शोषण करणारे, अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात आदिवासी देशभक्तांनी निष्ठेने लढा दिला. त्यांचा हा गौरवशाली इतिहास इथल्या प्रस्थापितांनी लिहिला नसला तरी इथल्या मातीला तो माहित आहे. मातीच आता माणसे पेटवील !

आज जगभरातील आदिवासींनी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी बोली, संस्कृती, समुहजीवन, सहकार्याची, प्रेमाची, माणुसकीची मूल्ये जगताला देण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे.

जगभर आदिवासी गौरवदिन साजरा करताना, भारतीय आदिवासींच्या सांस्कृतिक अस्मिता जपणे महत्त्वाचे

आहे. ९ ऑगस्टला आदिवासी लोककला, नाट्य, चित्र, शिल्प या कलांचे सादरीकरण, प्रदर्शन भरवायला हवे. शहरात, चौका-चौकात, खेड्या-पाड्यात या कलांचा आणि त्या सादर करणाऱ्यांच्या पारंपारिक भावनांचा आदर करणे गरजेचे आहे. आदिवासी क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास जगापुढे मांडून त्या क्रांतिकारकांच्या निष्ठेचा आणि प्रेरणांचा सन्मान व्हायला हवा. आदिवासी बोली या प्राचीन आहेत. या बोलीतील लोकनाट्य, लोकगीते, लोकसाहित्य तसेच आदिवासी बोलीतील साहित्याला प्रोत्साहन मिळेल अशा उपक्रमांची आखणी व्हायला हवी. या बोली जपण्यासाठी, टिकविण्यासाठी राज्य आणि केंद्राची योग्य अंमलबजावणी व्हायला हवी.

या विश्व आदिवासी गौरव दिनाच्या निमित्ताने भारतातील तसेच महाराष्ट्रातील आदिवासी समुहांच्या इथल्या लोकशाही व्यवस्थेकडून काही अपेक्षा आहेत, त्या पूर्ण व्हायला हव्यात.

१) भारतीय राज्यघटनेतील Scheduled Tribes या शब्दासाठी 'आदिवासी' शब्दाची नोंद व्हायला हवी.

२) भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशभरातील आदिवासींचे आदिवासीपण नष्ट करुन, त्यांचे वनवासीकरण करणे आणि त्याद्वारे देशभरातून तसेच परदेशातून विकासाच्या नावाखाली निधी उभा करण्याचा प्रकार राजरोसपणे चालू आहे तो थांबविणे.

३) आदिवासी मजूरांचा जनावरांसारखा लिलाव थांबविणे. हा लिलाव शहरातील बस स्टॅन्डवर, भर चौकात, रस्त्यावर चालतो. स्वातंत्र्यानंतरही या देशात आदिवासींचा जनावरांसारखा लिलाव होत असेल तर ती गोष्ट या देशातील सर्वाधिक अमानविय आहे.

४) आदिवासी लोककला ठेकेदारांच्या कचाट्यात सापडल्या असून, त्याचे नैसर्गिक सौंदर्य नष्ट होवून, त्यात व्यापारी दृष्टीकोन निर्माण झाला आहे. तो प्रथम थांबवायला हवा. कारण आदिवासींच्या कला या त्यांच्या आनंदासाठी आणि धरतीच्या पूजेसाठी असतात.

५) आदिवासी हे या भूमिचे मूळ निवासी असल्याने त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीवर त्यांचा पारंपारिक हक्क आहे. तो त्यांना देऊन स्वतंत्र आणि स्वायत्त जिल्ह्यांची, तालुक्यांची निर्मिती व्हायला हवी. घटनेतील ५ व्या व ६ व्या सूचीतील त्यांच्या स्वायत्ततेचा हक्क त्यांना मिळायला हवा.

६) गेल्या ६४ वर्षांनंतरही आदिवासी पाड्यापर्यंत प्राथमिक शिक्षण पोहोचले नाही. उदा. नंदुरबार जिल्ह्यात अतिदुर्गम भागात झापी, सिंधी, फलई, खडकी, भादल या गावांत स्वातंत्र्यानंतर प्राथमिक शाळा भरलेली नाही. यासारख्या महाराष्ट्रात असंख्य गावांत प्रथम प्राथमिक शिक्षण पोहोचायला हवे.

७) आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र 'आदिवसी शिक्षण आयोगाची' स्थापना करण्यासाठी मागणी समाजाकडून होत आहे, ती पूर्ण व्हायला हवी.

# पुणे-पिंपरी-चिंचवड शहरातील संस्था/ संघटना

## संघटना

१) आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.
२) आदिवासी महासंघ, पुणे.
३) महाराष्ट्र आदिवासी सेवा संघ, पुणे.
४) सह्याद्री आदिवासी तरुण मंडळ, पिंपळे गुरव, पुणे.
५) आदिवासी भिमाशंकर तरुण मंडळ, धानोरी, पुणे.
६) आदिवासी विकास मित्र मंडळ, दिघी, पुणे.
७) पिंपरी-चिंचवड अनुसुचित जमाती शिक्षक व कर्मचारी संघटना, पुणे.
८) पुणे म.न.पा.अनुसुचित जमाती कर्मचारी संघटना, पुणे.
९) सह्याद्री आदिवासी तरुण मंडळ, धानोरी, पुणे.
१०) कोकणा-कोकणी आदिवासी समाज सेवा संघ.
११) परधान समाज संघटना, पुणे.
१२) आरक्षण हक्क कृती समिती, पुणे.
१३) नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन, पुणे.
१४) पुणे जिल्हा आदिवासी विद्यार्थी संघटना, पुणे.
१५) वीर विरसा मुंडा आदिवासी कर्मचारी संघटना, पुणे.
१६) आदिम यंग ग्लॅडिएटर्स, पुणे.

---

## बचत/स्वयंरोजगार गट

१) त्रिमुर्ती आदिवासी महिला बचत गट, दिघी.
२) प्रेरणा आदिवासी महिला स्वयंरोजगार संस्था, पुणे.
३) भिमाशंकर आदिवासी महिला स्वयंरोजगार संस्था, पुणे.
४) आदिशक्ती महिला बचत गट, दिघी.

---

## गृहनिर्माण संस्था

१) सह्याद्री आदिवासी गृहरचना संस्था, पद्मावती, पुणे.
२) श्री.शिवनेर सहकारी गृहरचना संस्था, दापोडी, पुणे.
३) त्रिमुर्ती आदिवासी सह.गृहरचना संस्था मर्या., दिघी.

---

**प्रेरणा वधु-वर सुचक मंडळ, नवी सांगवी, पुणे**

---

**पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पत संस्था मर्या., पुणे.**

---



युवती प्रबोधन कार्यशाळेस उपस्थित युवती व
संस्थेचे कार्यकर्ते शपथ घेताना




आदिवासी युवती प्रबोधन कार्यशाळेत
मार्गदर्शन करताना डॉ. वैजयंती पटवर्धन



पेसा कायदा कार्यशाळा जुन्नर उपस्थित आदिवासी ग्रामपंचायत सदस्य



व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा सोमतवाडी उपस्थित विद्यार्थीनी



'परीक्षेला सामोरे जातानी' कार्यशाळेत प्रश्नपत्रिका संचाचे वितरण



गुणवंत विद्यार्थी कार्यक्रमात स्वागत गीत गाणारे स्कूलचे बालक



गुणवंत विद्यार्थी कार्यक्रम २०१५ उपस्थित विद्यार्थी व पालक




'अधिकारी माणूस' पुस्तक प्रकाशन करते समयी डॉ. नागनाथ कोतापल्ले
व लेखक श्री. सीताराम जोशी व सहकारी




'उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार' कार्यक्रमाचे
प्रास्ताविक करतांना श्री. नामदेव गंभिरे सर



'उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार' वितरण समयी
उपस्थित विद्यार्थी व पालक



चौथा 'स्व. देवराम गंभिरे स्मृतिपुरस्कार' वितरण प्रसंगी
गंभिरे कुटुंबिय, आश्रमशाळा राजुरचे मुख्याध्यापक व मान्यवर



गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमास मार्गदर्शन करताना
डॉ. नागनाथ कोतापल्ले



डॉ. नागनाथ कोतापल्ले ह्यांचे हस्ते स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार
स्विकारतांना कु. निखिल संतोष बांबळे इ. १० वी



डॉ. नागनाथ कोतापल्ले ह्यांचे हस्ते स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार
स्विकारतांना इ. १२ वी ची विद्यार्थ्यांनी कु. ऋतुजा गंभिरे



'अधिकारी माणूस' पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त करताना
संस्थेचे अध्यक्ष व लेखक श्री. सीताराम जोशी



डॉ. नागनाथ कोतापल्ले ह्यांचे समवेत संस्थेच्या दत्तक मुली.